# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.३१/०७/२०२४

**देहेरजी प्रकल्पातून वसई विरार शहर महानगरपालिकेस १९५ द.ल.ली. पाणी उपलब्ध करून देण्याचे मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे MMRDA ला निर्देश**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०५५ च्या प्रकल्पित लोकसंख्येस पुरेसे पाणी उपलब्ध होण्याकरिता देहेरजी मध्यम प्रकल्पातून पाणी आरक्षित करण्याबाबतच्या मा.आमदार श्री.हितेंद्र ठाकूर यांचे निवेदनासंदर्भात मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९ जुलै, २०२४ रोजी विधानभवन, मुंबई येथे बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत मा.आमदार श्री.हितेंद्र ठाकूर यांनी देहेरजी प्रकल्पासाठी वसई विरार महानगरपालिकेने रु.१६५ कोटी रक्कम जलसंपदा विभागाला सन २०१४-१५ मध्ये वर्ग केली असून धरणातून वसई विरार शहर महानगरपालिकेला जलसंपदा विभागाने दि.०४/०३/२०१४ च्या शासन निर्णयानुसार आरक्षित केलेला पाणीसाठा यापुढेही तसाच ठेवावा अशी मागणी केली. तसेच वसई विरार महानगरपालिकेच्या वाट्याचे पाणी इतर कुठेही न देणेबाबत नमूद केले. त्याअनुषंगाने बैठकीत मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी जलसंपदा विभागाने यापूर्वीच निर्गमित केलेल्या शासन निर्णय दि.०४/०३/२०१४ प्रमाणेच कार्यवाही करणे बाबत नगर विकास विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व जलसंपदा विभागास (MMRDA) निर्देश दिले. तसेच MMRDA कडील दि.०१/११/२०२२ रोजीच्या १५३ व्या बैठकीतील इतिवृत्तात पाणी वाटपाचे नियोजन अंतर्गत १९५ द.ल.ली.प्रतिदिन पाणी वसई विरार शहर महानगरपालिकेकरीता आरक्षित करण्याबाबत सुधारणा करण्यात यावी असे निर्देश दिले.

त्याचप्रमाणे सदर बैठकीत मा.आमदार श्री.हितेंद्र ठाकूर यांनी वसई परिमंडळात ४ नवीन सर्विस स्टेशनच्या वस्तूस्थितीबाबत, चिंचोटीकरिता सब स्टेशन उभारणे तसेच विरार शहरास कनेक्टीव्हिटी देणेसंबंधी केलेल्या उपाययोजना बाबत विचारणा करण्यात आली, त्याचप्रमाणे लीना पॉवर टेक कंपनी काम करीत नसल्याची तक्रारही यावेळी करण्यात आली. वसई वीज परिमंडळ समस्यांबाबतच्या या प्रश्नासंबंधी चिखलडोंगरी सर्विस स्टेशनचे काम करणेसाठी एजन्सी नियुक्त करण्याबाबत ७ दिवसांत निर्णय घ्यावा असे मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले असून उर्वरित कामण, कोपरी व मनोर सर्विस स्टेशनबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्याचप्रमाणे वसईच्या अंडरग्राऊंड केबलचा प्रस्ताव कोकण विभागाच्या ३००० कोटीच्या प्रस्तावात समाविष्ट करण्यात यावा व चिंचोटी येथे सब स्टेशन उभारण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले. तसेच याबाबत खात्री करावी जर लीना पॉवर टेक कंपनी जर व्यवस्थित काम करत नसेल तर सदर कंपनी बदलण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी यावेळी दिले.

सदर बैठकीस मा.पालकमंत्री श्री.रविंद्र चव्हाण, मा.आमदार श्री.हितेंद्र ठाकूर, मा.आमदार श्री.क्षितीज ठाकूर, मा.आमदार श्री.राजेश पाटील, मा.आमदार श्री.निरंजन

डावखरे, मा.अपर मुख्य सचिव (जलसंपदा विभाग) श्री.दीपक कपूर, मा.अपर मुख्य सचिव (उर्जा विभाग) श्रीमती आभा शुक्ला, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.संजीव कुमार, वसई विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त मा.श्री.अनिलकुमार पवार, मा.उपसचिव श्री.अजिंक्य बगाडे, कार्यकारी संचालक (कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मा.श्री. अतुल कपोले, तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेचे माजी महापौर मा.श्री.नारायण मानकर व मा.श्री.प्रवीण शेट्टी तसेच मा.श्री.प्रफुल साने इ.उपस्थित होते.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका